जगभर

# चीनमधील करोना व्हायरस

## चन्द्रशेखर पुरन्दरे

दक्षिण-पूर्व चीनच्या हुबाई प्रांतात वूहान शहरात या जीवघेण्या व्हायरसचा प्रादुर्भाव जानेवारीत सुरू झाला. अल्पावधीतच प्रश्नाने चीनमध्ये तर गंभीर रूप धारण केलेच पण त्याचा प्रसार हां हां म्हणता जगभर सुरू झाला कारण लोकांचा प्रवास. लेख लिहिण्याच्या वेळेपर्यंतची आकडेवारी अशी – एकूण मृत्यू २००० हून जास्त, जवळजवळ सगळेच चीनमध्ये. जपान, हाँगकाँग, तैवान, फिलिपिन्स, इराण, फ्रांसमध्ये प्रत्येकी एक-दोन. चीनमधील नव्या रुग्णांची संख्या १९००. एकूण संशयित रुग्णांची संख्या साठ हजारहून जास्त. सुमारे १२ हजार बरे झाल्याचाही दावा.

विकाराचा प्रसार हा एक भाग झाला. त्याबरोबरच त्याविषयीचे सरकारी धोरण हा अभ्यसनीय भाग आहे. विशेषत: चीनसारख्या शासकीय गोपनीयतेचा अट्टाहास असणाऱ्या देशात.

डिसेंबर महिन्यातच एका ३४ वर्षाच्या डॉक्टरने [ली वेनलिआंग] २००२-३ च्या सार्स व्हायरस सारखा घातक व्हायरस अस्तित्वात आल्याची शक्यता व्यक्त केली होती. त्याने चीनमध्ये सुमारे ९०० लोक मृत्यू पावले होते. लीने त्याच्या वैद्यकीय सहकाऱ्यांना हे खाजगीत कळवले. दक्षता घ्यायला व गुप्तता राखायलाही कळवले. हे सुमारे आठजण. पण त्याचा तो मेसेज सोशल मीडियावर प्रसृत झाला आणि सार्वजनिक खळबळ व्हायला सुरुवात झाली. प्रथम त्याच्या हॉस्पिटलच्या वरिष्ठांनी, नंतर पोलिसांनी त्याला त्वरित ताब्यात घेऊन 'अफवा पसरवतो' म्हणून दम दिला, सामाजिक शांतता बिघडवतो म्हणून दिलगिरी व्यक्त करायला लावली, खटल्याची धमकीही दिली. सुरुवातीला सरकारचे धोरण हे प्रकरण संपूर्णपणे दाबण्याचे होते. [आता परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर कमीतकमी व सोयीस्कर माहिती देण्याचे आहे.] सार्वजनिक घबराट नको याबरोबरच राजकीय पंचाईत नको आणि आम्ही परिस्थितीच्या नियंत्रणात आहोत हे स्वत:ला आणि लोकांना सिद्ध करण्याचा हट्ट. या अक्षम्य दिरंगाईमुळे संसर्ग आधीच आटोक्यात आला असता, तो नियंत्रणाबाहेर गेला.

याचे कारण चीनच्या व्यवस्थेत आहे. विरोध दडपणे ही संस्कृती पार्टीत व पर्यायाने शासनात खालपासून वरपर्यंत प्रत्येक पातळीवर आहे. त्यामुळे खरी घडामोड सांगितली जात नाही. जे सांगितले जाते ते वरिष्ठाला काय पसंत पडेल, तेच. राजकीय सत्तेसाठी ही परंपरा आहे. पण अशा प्रकारच्या अचानक उद्भवलेल्या अ-राजकीय उत्पाताला ही संस्कृती घातक ठरते.

मुळात हा व्हायरस आला असावा तो चिनी लोकांच्या मांसाहारात असणाऱ्या वन्य पशूंच्यामार्फत. त्यातील बहुतांशी पशूंची त्यांच्या आरोग्याच्या व परिणामत: मानवी आरोग्याच्या दृष्टीने काटेकोर तपासणी होत नाही. वूहानची लोकसंख्या एक कोटीहून जास्त. लोकांना जर वेळीच ही पशूखरेदी थांबवण्याचे आदेश दिले असते तर विकाराचा प्रसार आधीच नियंत्रणात आला असता. सरकारने ते मार्केट बंद केले पण लोकांना का ते सांगितले नाही. वस्तुत: चीनच्या राजकीय परिस्थितीत 'आदेश' म्हणजे हुकूम. त्याची अंमलबजावणी दहशतीने विना-अपवाद केली जाते. पण ती करायची तर विकार गंभीर आहे, सार्वजनिक आहे हे मान्य करायला लागले असते आणि नेमके तेच जाहीर करणे सरकार टाळत होते.

पण जानेवारीपासून ही साथ पसरू लागली. मग सरकारने घूमजाव केले. त्यात याच व्हायरसमुळे लीचा ६ फेब्रुवारीला मृत्यू झाला. त्याला त्याच्या एका पेशंटकडून हा संसर्ग झाला होता. मग मात्र निदान इंटरनेटवर तरी सरकारविरोधी वातावरण निर्माण झाले. सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ? अशी विचारणा सुरू झाली. या निषेधाला थोडा वाव देताच तो वाढू देणे सरकारलाच धोकादायक ठरेल हे लक्षात येऊन सेन्सॉरशिप कडक करण्यात आली. जे लोक या प्रकरणाच्या खुल्या बातम्यांची, अभिव्यक्तिस्वातंत्र्याची मागणी फोन, व्हाट्सऍप, इंटरनेट वरून करत होते, त्यांचे मेसेजेस वगळण्यात आले.

केंद्रीय सत्ताधारी कम्युनिस्ट पार्टीने मग स्थानिक वरिष्ठांना जबाबदार धरले, लीसारख्या सच्च्या माणसाचा बळी गेला याचा खेद व्यक्त केला, त्याचबरोबर अशा गोष्टी कोठेही घडतात अशी भलावणही केली ! तसेच मीडियाला लीच्या निधनावरच्या चर्चा 'मर्यदित' ठेवायला सांगण्यात आले म्हणजे सरकारविरोध

उघड्यावर येणार नाही. पार्टी आणि लष्कर हे चीनमधले सर्वेसर्वा. त्यांचे अस्तित्वच सत्तेवर अवलंबून असल्याने व्हायरसचा उपयोगही सत्ता अधिक बळकट करण्यासाठी कसा करता येईल याचा प्रयत्न आहे. [ही आपल्याकडच्या किंबहुना, जगभरच्या सत्ताधीशांची वृत्ती असते. कोणत्याही भल्या-बुऱ्या घटनेचा राजकीय फायदा लगेच उचलायचा.] उदाहरणार्थ, चीनच्या अध्यक्षाने सुरुवातीच्याच उच्चस्तरीय बैठकीत चीनच्या कम्युनिस्ट पार्टीच्या अखंडित सत्तेचे महत्त्व प्रतिपादन केले. [अखंडित म्हणजे निरंकुश]. लोकांमध्ये व्हायरसचा सामना करणे हे 'लोकयुद्ध आहे' ही भावना रुजवायचे आदेश पार्टीला देण्यात आले. हे माओच्या काळाची आठवण करून देणारे धोरण. त्यानुसार ज्या लोकांना संसर्ग झाला असेल त्यांच्यावर देखरेख स्थानिकांनी करायची. यात वैद्यकीय गरज व बाहेरच्यां-विरुद्धांचा आकस एकत्र येतात. बृहत समाजाच्या दृष्टीने ते हितावह नसते. वूहान व हुबाई प्रांतातील लोकांना बसेसमध्ये, हॉटेल्समध्ये प्रदेश नाकारला जात आहे.

या एकतंत्री, दमनकारी राजवटीमुळे प्रचंड लोकसंख्येवर अचानक निर्णायक नियंत्रण आणणे शक्य झाले. त्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर झाला. कोण माणूस कोणत्या वेळी कोठे आहे/होता हे त्याच्या मोबाईल/व्हाट्सऍपवरून सरकारला सहज शोधता येते. त्यात face recognition या तंत्राची भर. सरकारी नोंदींवर आधारित एका अंदाजानुसार आज चीनच्या निम्म्या लोकसंख्येच्या जाण्या-येण्यावर मर्यादा आल्या आहेत. आकड्यात ही संख्या ७६ कोटी लोक होते. त्यातील १५ कोटींना तर घरीच बसवण्यात आले आहे. प्रत्येक ठिकाणी लोकांवर नियंत्रण ठेवण्याची निराळी योजना करण्यात येते. काही ठिकाणी लोकांचे घराबाहेर/गल्लीबाहेर/शहराबाहेर पडणेच बंद किंवा मर्यादित करण्यात आले आहे; काही ठिकाणी घर-संकुलांनी रहिवाशांना पासेस दिले आहेत. आणि तो तिथलाच रहिवाशी असेल पण बाहेरगावाहून येत असेल तर त्याला प्रवेश नाकारला जातो. काही ठिकाणी घरातील एकाच व्यक्तीला विशिष्ट वेळासाठी घराबाहेर पडण्याची परवानगी असते, वगैरे. रेल्वे स्टेशनवर जर एखादा त्या गावात राहतो किंवा काम करतो हे कागदोपत्री सिद्ध करू शकला नाही तर त्याला गावात येण्याची परवानगी नाकारली जाते. खेड्यांकडे जाण्याचे मार्ग वाहने उभी करून किंवा तात्पुरते अटकाव घालून बंद करण्यात आले आहेत. या सगळ्या कारवाईची अंमलबजावणी तृणमूलाला स्वयंसेवक किंवा पार्टीचे कार्यकर्ते करतात. या कदाचित जास्तीच्या कारवाईने काही बाधित रुग्ण लपून राहण्याची व संसर्ग वाढवण्याची शक्यता आहे. स्वयंसेवक नागरिकांचे तापमान घेतात, त्यांच्या येण्याजाण्याच्या वेळा नोंदतात, त्यांना इतरांपासून अलग ठेवल्यावर ते अलगच राहत आहेत यावर नजर ठेवतात, वगैरे. हा संसर्ग दैनंदिन व प्रत्यक्ष नियंत्रणात आणणे ही या स्वयंसेवकांची जबाबदारी. त्यात मनमानी होण्याची शक्यता असते. [या यंत्रणेची आपल्याबरोबर तुलना करण्या-सारखी आहे. इष्ट वा अनिष्ट हा मुद्दा निराळा, केवळ परिमाण व परिणामकारकतेसाठी].

या दर्शनाबरोबरच चीनचा कमालीच्या शिस्तीचा कार्यक्षम अभियांत्रिकी चेहराही जगाला दिसला. १५००-१६०० संभाव्य रुग्णांसाठी हॉस्पिटल्स दोन आठवड्यात उभी करण्यात आली. विशेष म्हणजे उभी झाल्यावर एक आठवड्यानेही ही हॉस्पिटल्स रिकामी होती. म्हणजे एकतर तेवढे पेशंट्स त्या एरियात नसावेत किंवा हा सरकारची प्रतिमा जगाला दाखवण्याचा महागडा उद्योग होता.

या संकटाची खरी किंमत कळायला वेळ लागेल. सद्यस्थितीत चीनचे उत्पन्न अर्ध्या टक्क्याने व जागतिक उत्पन्न ४०० बिलियन डॉलर्सने घटेल असा अंदाज आहे. जर ही लागण जगभर झाली तर जागतिक अर्थव्यवस्थेत १.१ ट्रिलियन डॉलर्सची घट होईल असा अंदाज आहे. प्रचंड उत्पादक लोकसंख्या जवळपास स्थानबद्ध आहे. त्यांच्या नोकऱ्या, उद्योगधंदे ठप्प झाले आहेत. याचा चीनच्या निर्यातीवर परिणाम सुरू झाला आहेच. उदा. Apple, LandRover वगैरे. दरम्यान युरोप अमेरिकेला मोठ्या संख्येने उत्साहाने येणारे चिनी पर्यटक अदृश्य झाले आहेत. त्याचाही अनिष्ट परिणाम त्या त्या देशांवर व्हायला सुरुवात झाली आहे.

शिवाय चिनी सरकारची विश्वासार्हता संशयास्पद असल्याने केंद्र सरकारने प्रकरणाची सूत्रे हातात घेतल्यानंतरच्या आकडेवारीबद्दल संशय येतो. 'आधीच्यापेक्षा' 'आता' मृतांची/ बाधितांची संख्या कमी होत आहे या अधिकृत दाव्याविषयी त्यामुळे भुवया उंचावतात.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk